# उपनिबंधक,सहकारी संस्था आर दक्षिण विभाग मुंबई यांचे कार्यालय

३०३,अे विंग, ३ रा मजला,बी एम सी गोडाऊन इमारत,संस्कृती कॉम्प्लेक्स जवळ,ठाकूर कॉम्प्लेक्स, ९० फुट रोड, कांदीवली (पूर्व) मुंबई ४०० १०१

---

## महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ७७(अ) आदेश

जा.क्र.मुंबई उपनि/आर दक्षिण विभाग/ १४०७ /२०१८.

दिनांक ८/५/२०१८.

वाचावे : १. महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ७७ (अ) मधील तरतूद.

२. श्री. तानाजी जाधव यांचेकडील दिनांक ०४.११.२०१७ व १६.०२.२०१८ ०१.०३.२०१८ रोजीचे तक्रार अर्ज.

३. या कार्यालयाकडील दिनांक २०.०२.२०१८ रोजीचे पत्र.

४. संस्थेकडील दिनांक १२.११.२०१७, २०.०१.२०१८, ३०.०१.२०१८, १६.०२.२०१८ ,२८.०२.२०१८ व ०५.०४.२०१८ रोजीचा खुलासा.

५. महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ७९ दिनांक १५.०१.२०१८ रोजीचे पत्र.

६. महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ७७ (अ) दिनांक २०.०३.२०१८ रोजीची नोटीस.

७. श्री तानाजी जाधव यांचेकडील दिनांक १२.०३.२०१८ रोजीचा खुलासा.

ज्याअर्थी, राज वैभव कृपा को.ऑप.हौ.सो.लि., राज वैभव-१, महावीर नगर, कांदिवली (पश्चिम) मुंबई-६७ संस्था महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ९ अन्वये नोंदविण्यांत आलेली असून तिचा नोंदणी क्र. बीओएम/डब्ल्यु आर/एचएसजी/टीसी/ ११३३४ ऑफ २००१-२००२ दिनांक १४.०८.२००१ असा आहे. आणि,

ज्याअर्थी राज वैभव कृपा को.ऑप.हौ.सो.लि., राज वैभव-१, महावीर नगर, कांदिवली (पश्चिम) मुंबई-६७ (यापुढे संस्था असे वाचावे) या संस्थेचे कामकाज महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० (यापुढे अधिनियम असे वाचावे), महाराष्ट्र सहकारी संस्थांचे नियम १९६१ (यापुढे नियम असे वाचावे), व संस्थेच्या नोंदणीकृत उपविधी व शासनाने वेळोवेळी निर्गमित केलेले शासन निर्णय व परिपत्रकामधील तरतूदीस अनुसरुन कामकाज करणे आवश्यक आहे. आणि,

ज्याअर्थी, वरील संस्था बृहन्मुंबईच्या आर दक्षिण विभागात कार्यरत असल्याने त्या संस्थेचे निबंधक, उपनिबंधक, सहकारी संस्था, आर दक्षिण विभाग, मुंबई हे आहेत आणि,

ज्याअर्थी, संस्थेचे सभासद श्री तानाजी जाधव यांनी संस्थेच्या कार्यालयीन कामाकजावाबत तसेच इतर मुद्यांबावत या कार्यालयाकडे संदर्भ क्र २ च्या पत्राने तक्रार अर्ज दाखल केलेले होते. तक्रार अर्जातील मुद्यांच्या अनुषंगाने उचित कार्यवाही करुन त्याची प्रत या कार्यालयास सादर करणेबाबत संदर्भ क्र. ३ च्या पत्राने संस्थेस अवगत करण्यात आलेले होते. तक्रार अर्जातील मुद्यांच्या अनुषंगाने संस्थेने संदर्भ क्र ४ च्या पत्राने खुलासा सादर केलेला असला तरी तो तक्रारीतील मुद्यांच्या अनुषंगाने असून तो मोघम स्वरुपाचा खुलासा असल्याचे दिसून येत आहे. आणि,

ज्याअर्थी, संस्थेचे सभासद तानाजी जाधव यांनी संस्थेच्या कार्यालयीन कामकाजावाबत तसेच आवश्यक असलेली कागदपत्रे उपलब्ध करुन देणेबावत संस्था पदाधिकारी यांच्याकडे विनंती केलेली असतानाही त्यांनी विहीत मुदतीत कलम ३२ मधील तरतुदीनुसार तसेच मागणी केलेली कागदपत्रे उपलब्ध करुन दिलेली नसल्यामुळे संदर्भ क ५ अन्वये कलम ७९ (१) अन्वये निर्देश देण्यात आले. निदेश देण्यात आल्या नंतरही सभासदांना संपुर्ण माहिती न देता व अर्धवट व विना स्वाक्षरीच्या प्रती उपलब्ध करुन देण्यात आल्या असल्याचे या कार्यालयाच्या निदर्शनास आणून दिलेले असल्यामुळे श्री. तानाजी जाधव यांनी संस्था पदाधिकारी यांच्यावर कायदयातील तरतुदीनुसार आवश्यक ती कार्यवाही त्वरीत करणेबावत या कार्यालयास अवगत केलेले आहे. आणि,

ज्याअर्थी, संस्थेची विशेष सर्वसाधारण सभा दिनांक १६.०२.२०१३ रोजी आयोजित करण्यात आलेली असून दिनांक ०१.०४.२०१३ ते ३१.०३.२०१८ या कालावधीसाठी श्री तुषार व्यास, श्री आनंद मनीयार, श्री धवन कपासी, श्री भिकुभाई लाढोया, श्री अरुण मगरे यांची पुढील ५ वर्षासाठी कार्यकारी समिती सदस्य नियुक्तीबाबतचा ठराव मंजूर करण्यात आला असल्याचे इतिवृत्तामध्ये नमुद केले आहे. आणि,

ज्याअर्थी, संस्थेने दिनांक १७.०९.२०१७ रोजी निर्गमित केलेल्या वार्षिक अहवाल पाहता २०१६-१७ या कालावधीतील व्यवस्थापक समितीमध्ये श्री तुषार व्यास, श्री आनंद मनीयार, श्री धवन कपासी, श्री भिकुभाई लाढोया, श्री अरुण मगरे,श्री अजित संपत, श्री किरण शहा, व श्री हरेश दवे अशा एकुण ०८ समिती सदस्यांची रचना असल्याची दिसून येत आहे. सबब ९७ व्या घटना दुरुस्ती झाल्या नंतर व्यवस्थापक समितीमध्ये को ऑप करण्याची तरतुद नसतानाही ०३ समिती सदस्यांना को ऑप करण्यात आल्याचे दिसून येत आहे. आणि,

Scanned by CamScanner

ज्याअर्थी, महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० मध्ये ९७ व्या घटना दुरुस्ती नुसार बदल करण्यात आलेले असून सदरची दुरुस्ती दिनांक १४.०२.२०१३ च्या अधिसूचने व्दारे संपुर्ण महाराष्ट्रामध्ये लागू करण्यात आलेली आहे. सदर अधिसुचनेव्दारे सहकारी संस्थांच्या निवडणूका घेणेसाठी मा. राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरण महाराष्ट्र राज्य पुणे यांची शासन अधिसुचना दिनांक ३०.०३.२०१३ च्या आदेशान्वये स्थापना करण्यात आलेली असून महाराष्ट्र सहकारी संस्था (समितीची निवडणूक ) नियम २०१४ दिनांक ११.०९.२०१४ अन्वये अधिसुचित करण्यात आलेले आहे. असे असतानाही संस्थेने स्व:ताच्या अधिकारात विशेष सर्वसाधारण सभा दिनांक १६.०२.२०१३ च्या सभेमध्ये व्यवस्थापक समितीची रचना केलेली असून ती कायदा व नियमाच्या विरुध्द आहे. आणि,

ज्याअर्थी, दिनांक १६.०२.२०१३ रोजी झालेल्या विशेष सर्वसाधारण सभेत नवीन समितीचे गटन करण्यात आलेले असून त्याचा कालावधी दिनांक ३१.०३.२०१८ रोजी समाप्त होत असतानाही मध्यांतरी ०३ समिती सदस्यांना को ऑप केलेले असून त्यास शासनाची मान्यता घेण्यात आलेली नाही. तसेच चेअरमन यांच्या नियुक्तीस खात्याची मान्यता घेण्यात आलेली नसल्यामुळे महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ७३ (कब) (१४) नुसार प्रत्येक सहकारी संस्थेने राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरणाला किंवा प्रभाग सहकारी निवडणूक अधिकारी यांच्या कार्यालयात, तिची मुदत संपण्याच्या किमान सहा महिन्यापूर्वी आपला पदावधी संपण्यांबाबत कळविण्यांची तरततुद आहे तसेच समितीच्या किंवा तिच्या पदाधिका- यामध्ये निर्माण झालेल्या कोणत्याही रिक्त पदाबाबत असे रिक्त पद निर्माण झाल्यापासून पंधरा दिवसांच्या आंत कळविणेची तरतुद आहे आणि

ज्याअर्थी महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ७३ आय (२) नुसार समितीने तिची निवडणूक घेण्यासंबंधात , राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरणाला कळविण्यांस हेतुपुरस्सर कसूर केली असेल, तर आणि त्यामुळे कोणत्याही कारणास्तव, मुदत संपण्यापूर्वी समितीची निवडणूक घेता आली नसेल तर, समितीचे सदस्य त्यांचे अधिकारपद धारण करण्यांचे बंद करतील आणि अशा परिस्थितीत निबंधक अधिनियमाच्या कलम ७७ अ अन्वये कारवाई करणेची तरतुद आहे आणि

ज्याअर्थी, व्यवस्थापक समितीची निवडणूक दिनांक १६.०२.२०१३ रोजी केलेली असून ती कायदा व नियमाचे उल्लंघन करुन केलेली असल्याने ते अवैध आहे. व्यवस्थापक समितीचा कालावधी समाप्त झालेला असतानाही आपण जाणीव पुर्वक निवडणूक घेणेसाठी आवश्यक असलेली कागदपत्रे सादर करण्यास तसेच महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ७३ (आय) मध्ये विनिर्दिष्ट करण्यांत आल्याप्रमाणे, व्यवस्थापक समितीची मुदत संपण्यापूर्वी समितीची रचना करण्यासाठी, निवडणूक घेण्याकरिता आवश्यक व्यवस्था करण्यास कसुर केलेली आहे आणि

ज्याअर्थी, व्यवस्थापक समिती, संस्थेतील सदस्याच्या हितास बाधक होईल अशी कृती करीत असल्यामुळे तसेच मा.राज्य सहकारी निवडणूक प्राधिकारणाने सहकार अधिनियमाच्या तरतुदी अन्वये विहित मुदतीमध्ये निवडणूक घेणेस कसुर केलेली आहे आणि,

ज्याअर्थी, ज्यावेळेस समितीची मुदत वाढविली नसेल किंवा वाढविल्यानंतर सुध्दा निवडणूक घेतली नसेल त्यामुळे नवीन समिती नेमली गेली नसेल अशावेळेस निबंधकाने प्राधिकृत अधिकारी यांची नियुक्ती करणेसाठी योग्य ती पावले उचलावयास पाहिजेत. समितीचा कालावधी ज्याक्षणी संपतो, त्यावेळेस व्यवस्थापन समितीचा कालावधी समाप्त होतो, त्यामुळे अशा समितीला पुढील काळासाठी काम करण्यांचा अधिकार प्राप्त होत नाही. याच कारणासाठी समितीचे म्हणणे ऐकूण घेण्यांची जरुरी नाही अशी तरतुद आहे आणि,

ज्याअर्थी, वर नमुद केलेली परिस्थिती विचारात घेता आणि व्यवस्थापक समितीने सामुहिक रित्या वार्षिक सर्वसाधरण सभेमध्ये सादर केलेल्या राजीनाम्यामुळे व्यवस्थापक समितीची गणपुर्ती (Quoram) पुर्ण होत नसुन संस्थेचे कामकाज साक्षेपाने पार पाडता येणार नाही ही वस्तुस्थिती निदर्शनास येत आहे. सबब संस्थेवर महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ७७(अ) अन्वये प्राधिकृत अधिकारी का नियुक्त करण्यात येऊ नये? याबाबतचा लेखी खुलासा सादर करणेसाठी संदर्भ क्र ६ अन्वये सुनावणी निर्गमित करण्यात आलेली होती. आणि,

ज्याअर्थी, संदर्भ क्र. ६ अन्वये निर्गमित करण्यात आलेल्या नोटीसीच्या अनुषंगाने या कार्यालयात दिनांक ०५.०४.२०१८ रोजी सुनावणी घेण्यात आलेली असून सदर सुनावणीस अर्जदार श्री तानाजी जाधव तसेच संस्थेतर्फे अॅड विजय गागन, चेअरमन श्री अजित संपत, श्री नितेश कपासी, श्री. अरुण मगरे हे उपस्थित असून नस्ती निर्णयार्थ बंद करण्यात आले. आणि,

Scanned by CamScanner

**संस्थे तर्फे खालील प्रमाणे म्हणणे सादर केले.**

१. संस्थेने दिनांक १६.०२.२०१३ रोजी विशेष सर्वसाधारण सभा आयोजित केली व त्यामध्ये ०५ समिती सदस्यांची निवड करण्यात आली व त्यानंतर नव्याने ०३ समिती सदस्यांची निवड करण्यात आली.
२. दिनांक ०३.०७.२०१६ रोजी ०२ व्यवस्थापक समिती सदस्यांनी राजीनामे दिले.
३. दिनांक ३०.०९.२०१६ रोजी पुन्हा ०२ समिती सदस्यांना सहाय्यक म्हणून मदतनीस घेण्यात आले.

**अर्जदार श्री तानाजी जाधव यांनी खालील प्रमाणे म्हणणे सादर केलेले आहे.**

१. दिनांक १६.०२.२०१३ रोजी व्यवस्थापक समितीची निवडणूक बेकायशीर झालेली आहे त्यामुळे व्यवस्थापक समिती बरखास्त करुन प्राधिकृत अधिकारी यांची नियुक्ती करण्यात यावी.

**अभिप्राय :-**

संस्थेने दाखल केलेले वर नमुद मुद्दे विचारात घेतले असता , संस्थेने वा समिती सदस्याने कोणतेही लेखी म्हणणे सादर केलेले नाही. संस्थेची विशेष सर्वसाधारण सभा दिनांक १६.०२.२०१३ रोजी झालेली असून ०५ समिती सदस्यांची नव्याने निवड करण्यात आलेली आहे. त्यानंतर काही समिती सदस्यांना को ऑप करण्यात आले होते. त्यामुळे व्यवस्थापक समिती बेकायदेशी / अनधिकृत रित्या संस्थेचे कामकाज करीत असल्याचे निदर्शनास आलेले आहे.

महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ७३ आय (२) नुसार समितीने तिची निवडणूक घेण्यासंबंधात . राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरणाला कळविण्यांस हेतुपुरस्सर कसूर केलेली आहे. व्यवस्थापक समितीची २०१२ मध्ये समाप्त झालेली असतानाही सन २०१३ च्या वार्षिक सर्वसाधारण सभेमध्ये समितीची रचना करण्यात आलेली असल्यामुळे कायदा व उपविधीतील तरतुदीचे उल्लंघन केलेले आहे.

त्याअर्थी वर नमुद परिस्थती विचारात घेता संस्थेचे कामकाज साक्षेपाने पार पाडता येणार नाही ही वस्तुस्थिती निदर्शनास येत असल्यामुळे संस्थेचे दैनदिन कामकाज चालविण्यासाठी व संस्थेवर त्वरीत कार्यवाही करणे आवश्यक असल्यामुळे महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ७७ अ अन्वये प्राधिकृत अधिकारी यांची नियुक्ती करणेची आवश्यकता असल्याची माझी खात्री झालेली असल्यामुळे, मी खालील प्रमाणे आदेश निर्गमित करीत आहे.

## आ दे श

महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ७७ अ (१) (बी) अन्वये मला प्राप्त झालेल्या अधिकारानुसार मी डॉ. अविनाश भागवत, उपनिबंधक, सहकारी संस्था,आर/दक्षिण विभाग, मुंबई याद्वारे राज वैभव कृपा को.ऑप.हौ.सो.लि., राज वैभव-१, महावीर नगर, कांदिवली (पश्चिम) मुंबई-६७ या संस्थेच्या विदयमान व्यवस्थापक समिती निष्प्रभावीत करीत असून संस्थेचे दैनंदिन कामकाज पाहणेसाठी श्री प्रकाश चव्हाण, प्रमाणति लेखापरीक्षक याची प्राधिकृत अधिकारी म्हणून नियुक्त करीत आहे.

सदरचा आदेश आज दि. ८/ ५/२०१८ रोजी माझी सही व या कार्यालयाच्या मुद्रेसह दिला असे.

**सही/-**
**(डॉ.अविनाश भागवत),**
**उपनिबंधक,**
**सहकारी संस्था, आर दक्षिण विभाग, मुंबई**

**प्रत,**
श्री प्रकाश चव्हाण, प्रमाणति लेखापरीक्षक,
यांना कळविण्यात येते की, संस्थेच्या माजी पदाधिकारी यांचेकडून दप्तराचा ताबा त्वरीत घेऊन तसा अहवाल या कार्यालयात अवगत करावा.

प्रति,
१) अध्यक्ष / सचिव,
राज वैभव कृपा को.ऑप.हौ.सो.लि.,
राज वैभव-१, महावीर नगर, कांदिवली (पश्चिम) मुंबई-६७
२) चेअरमन,
राज वैभव कृपा को.ऑप.हौ.सो.लि.,
राज वैभव-१, महावीर नगर, कांदिवली (पश्चिम) मुंबई-६७

Scanned by CamScanner

३) सचिव,
राज वैभव कृपा को.ऑप.हौ.सो.लि.,
राज वैभव-१, महावीर नगर, कांदिवली (पश्चिम) मुंबई-६७

४) खजिनदार,
राज वैभव कृपा को.ऑप.हौ.सो.लि.,
राज वैभव-१, महावीर नगर, कांदिवली (पश्चिम) मुंबई-६७

५) श्री तुषार व्यास - समिती सदस्य,
राज वैभव कृपा को.ऑप.हौ.सो.लि.,
राज वैभव-१, महावीर नगर, कांदिवली (पश्चिम) मुंबई-६७

६) श्री आनंद मनीयार- समिती सदस्य,
राज वैभव कृपा को.ऑप.हौ.सो.लि.,
राज वैभव-१, महावीर नगर, कांदिवली (पश्चिम) मुंबई-६७

७) श्री धवन कपासी- समिती सदस्य,
राज वैभव कृपा को.ऑप.हौ.सो.लि.,
राज वैभव-१, महावीर नगर, कांदिवली (पश्चिम) मुंबई-६७

८) श्री भिकुभाई लाढीया - समिती सदस्य,
राज वैभव कृपा को.ऑप.हौ.सो.लि.,
राज वैभव-१, महावीर नगर, कांदिवली (पश्चिम) मुंबई-६७

९) श्री अरुण मगरे - समिती सदस्य ,
राज वैभव कृपा को.ऑप.हौ.सो.लि.,
राज वैभव-१, महावीर नगर, कांदिवली (पश्चिम) मुंबई-६७

१०) **श्री अजित संपत** - समिती सदस्य,
राज वैभव कृपा को.ऑप.हौ.सो.लि.,
राज वैभव-१, महावीर नगर, कांदिवली (पश्चिम) मुंबई-६७

११) **श्री किरण शहा,**-समिती सदस्य ,
राज वैभव कृपा को.ऑप.हौ.सो.लि.,
राज वैभव-१, महावीर नगर, कांदिवली (पश्चिम) मुंबई-६७

१२) **श्री हरेश दवे**- समिती सदस्य,
राज वैभव कृपा को.ऑप.हौ.सो.लि.,
राज वैभव-१, महावीर नगर, कांदिवली (पश्चिम) मुंबई-६७

१३) श्री. तानाजी जाधव- अर्जदार,
५ ए, राज वैभव कृपा को.ऑप.हौ.सो.लि.,
राज वैभव-१, महावीर नगर, कांदिवली (पश्चिम) मुंबई-६७

२/- १ ते १२ यांना कळविणेत येते की, संस्थेच्या सपुर्ण दप्तराचा ताबा निवनियुक्त प्राधिकृत अधिकारी यांच्याकडे सुपुर्द करुन तसा अहवाल सादर करावा तसेच सदर नियुक्तीच्या आदेशापासून संस्था पदाधिकारी यांच्या कोणताही आर्थिक बाबी संदर्भात बँक व्यवहार करण्यात येऊ नये. अन्यथा याबाबतची सर्वस्वी जबाबदारी सबंधितांची राहील याची कृपया गंभीर नोंद घ्यावी.

**१४) मा.अध्यक्ष/सचिव**, व्यवस्थापक, मुंबई जिल्हा गृहनिर्माण सहकारी संस्थाचा संघ,विकास प्रिमायसेस ,फोर्ट मुंबई- ०१

**१५)** चेअरमन/व्यवस्थापक, दि मुंबई जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक कांदीवली

२/- **यांना कळविण्यात येते की, सदर संस्थेच्या खात्यावरील विदड्रावलचे व्यवहार नवनियुक्त प्राधिकृत अधिकारी यांच्या मान्यतेशिवाय करण्यात येऊ नये.**

**प्रत माहितीसाठी सविनय सादर**

१.मा.विभागीय सहनिबंधक, सहकारी संस्था मुंबई विभाग मुंबई
२.मा.जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था (४) मुंबई
३. निवड नस्ती.

उपनिबंधक,
सहकारी संस्था, आर दक्षिण विभाग, मुंबई

Scanned by CamScanner